Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

**C**

# Paper-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) ................................................

2. (Signature) .........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## MAY - 01316

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **20** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Marathi
## Paper III
# मराठी
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. 'डिप्रेस्ड क्लास मिशन सोसायटी' ह्या संस्थेची स्थापना कोणी केली ?

(A) विठ्ठल रामजी शिंदे

(B) शाहू महाराज

(C) नारायण मेघाजी लोखंडे

(D) कृष्णाजी पांडुरंग भालेकर

2. सत्यशोधक समाजाची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?

(A) 1871

(B) 1872

(C) 1873

(D) 1874

3. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ इसवी सन 1883 त लिहिला; पण हा ग्रंथ इसवी सन 1960 पर्यंत प्रकाशित झालेला नव्हता.

(A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(C) संपूर्ण विधान बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक

4. परमहंससभेची स्थापना कोणी केली ?

(A) दादोबा पांडुरंग तर्खडकर

(B) आत्माराम पांडुरंग तर्खडकर

(C) भास्कर पांडुरंग तर्खडकर

(D) वासुदेव बाबाजी नवरंगे

5. तुकारामतात्या पडवळ यांनी पुढीलपैकी कोणता ग्रंथ लिहिला ?

(A) जातिभेदविवेकसार

(B) जातिभेद

(C) विटाळविध्वंसन

(D) अस्पृश्यतेचा प्रश्न

6. रा.रं. बोराडे आणि भास्कर चंदनशीव हे लेखक एकाच प्रादेशिक पर्यावरणातील आहेत; तथापि रा.रं. बोराडेंच्या लेखनातून प्रकट होणाऱ्या आशयसूत्रांपेक्षा चंदनशीव यांच्या साहित्यातील आशयसूत्रे वेगळी आढळतात.

(A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(C) संपूर्ण विधान बरोबर

(D) संपूर्ण विधान चूक

7. 1865 साली मुंबईत विधवाविवाहोत्तेजक मंडळाची स्थापना कोणी केली होती ?

(A) गोपाळ हरि देशमुख, न्या. रानडे व विष्णुशास्त्री पंडित

(B) बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, विष्णुशास्त्री पंडित

(C) गोपाळ गणेश आगरकर, महादेव गोविंद रानडे, भाऊ महाजन

(D) तुकारामतात्या पडवळ, न्या. रानडे, न्या. तेलंग

8. भारतीय पातळीवरती अस्पृश्यतेचा प्रश्न मांडणारे पहिले समाजसुधारक कोण ?

(A) शाहू महाराज

(B) विठ्ठल रामजी शिंदे

(C) जोतीराव फुले

(D) तुकारामतात्या पडवळ

9. डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या 'बहिष्कृत भारत' या नियतकालिकातील अग्रलेखांचे संपादन कोणी केले ?
   (A) रत्नाकर गणवीर
   (B) अरुण कांबळे
   (C) वसंत मून
   (D) चां. भ. खैरमोडे

10. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या हिंदुत्वविषयक लेखांचे 'हिंदुत्वदर्शन' ह्या पुस्तकाचे संपादन कोणी केले ?
   (A) विलास खोले
   (B) प्र. न. जोशी
   (C) भा. द. खेर
   (D) द. न. गोखले

11. वसवेश्वरांच्या कल्याणक्रांतीवर आधारलेले गिरीश कर्नाड यांची नाट्यकृती कोणती ?
   (A) शिरिसंपिगे
   (B) तलेदण्ड
   (C) हयवदन
   (D) तुघलक

12. सतीश काळसेकर यांची 'निशासूक्त' ही दीर्घ कविता कोणत्या लघुनियतकालिकात प्रसिद्ध झाली ?
   (A) असो
   (B) टिंब
   (C) येरू
   (D) अ ब क ड ई

13. 'कवितारती' या नियतकालीकाचे संपादक कोण ?

(A) गंगाधर पाटील

(B) म. सु. पाटील

(C) पुरुषोत्तम पाटील

(D) गो. तु. पाटील

14. प्रेमा कंटक यांच्या कादंबऱ्यांमधून कोणती विचारसरणी प्रकट होते ?

(A) गांधीवादी

(B) समाजवादी

(C) स्त्रीवादी

(D) मार्क्सवादी

15. 'निषाद आणि शमा' हे सदर कोणत्या नियतकालिकातून प्रकाशित झाले ?

(A) छंद

(B) अभिरुची

(C) युगवाणी

(D) प्रतिष्ठान

16. 'कोसला ही फसलेली कादंबरी आहे' हे विधान कोणाचे आहे ?

(A) विलास सारंग

(B) नरहर कुरुंदकर

(C) दिलीप चित्रे

(D) हरिश्चंद्र थोरात

17. 'वज्राघात' कादंबरीतील मेहेरजानच्या मुलाचे नाव काय ?

(A) रणदुल्लखान

(B) रणमस्तखान

(C) रामराजे

(D) राजाराम

18. 'औदुंबर म्हणजे विरागी योग्याचे प्रतीक' हा औदुंबर या कवितेचा अन्वयार्थ कोणी लावला आहे ?

(A) दि. के. बेडेकर

(B) वा. ल. कुलकर्णी

(C) व. दि. कुलकर्णी

(D) गो. म. कुलकर्णी

19. 'धग' या कादंबरीतील नायिकेचे नाव काय आहे ?

(A) कौतिक

(B) पार्वती

(C) राधा

(D) लक्ष्मी

20. प्र. ई. सोनकांबळे यांचे आत्मकथनात्मक लेखान प्रथम कोणत्या नियतकालिकात प्रकाशित झाले ?

(A) अस्मितादर्श

(B) नवभारत

(C) अनुष्टुभ

(D) सत्यकथा

21. औपरोधिक स्वरूपाची विनोदनिर्मिती करणारे 'संकासूर' नावाचे पात्र कोणत्या प्रयोगरूप कला प्रकारामध्ये असते ?

(A) तमाशा

(B) दशावतार

(C) लळित

(D) वरीलपैकी कोणतेही नाही

22. लोकसाहित्याभ्यासात लोकगीताच्या निर्मिती-विषयीचा 'समुदायवादी सिद्धांत' कोणी मांडला ?

(A) जैकब ग्रिम

(B) बिशप पर्सी

(C) जेम्स चाईल्ड

(D) ए. डब्ल्यु. श्लेगेल

23. 'बृहत्त्कथा' या संग्रहातील कथांचे कर्तेपण कोणास दिले जाते ?

(A) सोमशर्मा

(B) गुणाढ्य

(C) सोमदेव

(D) बुद्धस्वामी

24. थिआडोर बेनफे हा जसा प्राच्यविद्याविशारद होता, तसाच तो तौलनिक भाषाशास्त्राचा व्यासंगी अभ्यासक होता. मात्र तो लोकसाहित्याचा अभ्यासक नव्हता.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

25. 'अपौरुषेय वाङ्मय' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) कमलाबाई देशपांडे

(B) मालतीबाई देशपांडे

(C) सरोजिनी बाबर

(D) दुर्गा भागवत

26. 'इंग्लीश ॲन्ड मराठी स्टायलिस्टिक आस्पेक्टस् ऑफ लिटररी ट्रान्सलेशन' हा तौलनिक साहित्यात मोलाची भर घालणारा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) विलास सारंग

(B) दिलिप धोंडगे

(C) प्रकाश देशपांडे केजकर

(D) रमेश धोंगडे

27. शेक्सपिरियन 'प्रभावा'तून मराठी रंगभूमीवर आलेले पहिले शोकान्त नाटक कोणते ?

(A) पुण्यप्रभाव

(B) थोरले माधवराव पेशवे

(C) जयपाळ

(D) कीचकवध

28. काम्यूच्या 'कॅलिगुला' या नाटकाचा अनुवाद 'चंद्र नभीचा ढळला' या नावाने कोणी केला आहे ?

(A) चिं. त्र्यं. खानोलकर

(B) रत्नाकर मतकरी

(C) पुरुषोत्तम दारव्हेकर

(D) विद्याधर पुंडलिक

29. तौलनिक साहित्याभ्यासात महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या 'आफ्टर ॲम्नेशिया' ह्या ग्रंथाचे कर्ते कोण ?

(A) गणेशदेवी

(B) रोमिला थापर

(C) मीनाक्षी मुखर्जी

(D) अमिया देव

30. 'एन्कीच्या राज्यात', या अस्तित्ववादी मानल्या जाणाऱ्या कादंबरीचे लेखक कोण आहेत ?

(A) दिलिप चित्रे

(B) श्याम मनोहर

(C) भाऊ पाध्ये

(D) विलास सारंग

31. 'सेकंड सेक्स' या ग्रंथाचे मराठीमध्ये प्रथम भाषांतर कोणी केले आहे ?

(A) शांता किर्लोस्कर

(B) शांता गोखले

(C) शारदा साठे

(D) मुक्ता मनोहर

32. पुढीलपैकी कोणत्या कादंबरीवर स्त्रीवादाचा प्रभाव दिसून येतो ?

(A) पडझड

(B) रीटा वेलिणकर

(C) टिकलीएवढं तळं

(D) सुखदा

33. 'मी बाई आहे म्हणून' हा ग्रंथ कोणी संपादित केला आहे ?

(A) विमल मोरे

(B) विद्युत भागवत

(C) शारदा साठे

(D) छाया दातार

34. 'भारतीय स्त्री-जीवन', हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(A) विद्या बाळ

(B) प्रेमा कंटक

(C) गीता साने

(D) गोदावरी परूळेकर

35. 'स्त्री-प्रश्नांची चर्चा — एकोणिसावे शतक' या ग्रंथाच्या लेखिका कोण आहे ?

(A) प्रतिभा रानडे

(B) कमलाबाई रानडे

(C) विमल भालेराव

(D) तारा भवाळकर

36. 'कथाकार शंकर पाटील' हा ग्रंथ कोणाचा आहे ?

(A) आनंद यादव

(B) मोहन पाटील

(C) नागनाथ कोत्तापल्ले

(D) वासुदेव मुलाटे

37. साखर कारखान्याच्या आगमनामुळे झालेल्या बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी कोणती ?

(A) शिदोरी

(B) पाचोळा

(C) धग

(D) गोतावळा

38. 'लिगाड आणि खांदेपालट' ही कलाकृती कोणाची आहे ?

(A) शंकर पाटील

(B) तानाजी पाटील

(C) आनंद पाटील

(D) मोहन पाटील

39. 'हसले गं बाई फसले' हे वगनाट्य कोणी लिहिले आहे ?

(A) आनंद यादव

(B) रा. रं. बोराडे

(C) व्यंकटेश माडगूळकर

(D) वसंत सबनीस

40. ग. ल. ठोकळ संपादित 'सुगी' या काव्यसंग्रहाला कुणाची प्रस्तावना आहे ?

(A) वि. स. खांडेकर

(B) ना. गो. कालेलकर

(C) विभावरी शिरूरकर

(D) पु. ल. देशपांडे

41. माधव कोंडविलकर यांनी पुढीलपैकी कोणते आत्मकथन लिहिले आहे ?

(A) जातीला जात वैरी

(B) आठवणींचे पक्षी

(C) मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे

(D) रापी

42. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढीलपैकी कोणते नियतकालिक चालवले ?

(A) स्वराज्य

(B) प्रबुद्ध भारत

(C) दीनबंधु

(D) नवभारत

43. '72 मैल' या कादंबरीचे लेखक कोण आहेत ?

(A) अशोक व्हटकर

(B) नामदेव व्हटकर

(C) नामदेव कांबळे

(D) अण्णाभाऊ साठे

44. 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' हा समीक्षाग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(A) शरणकुमार लिंबाळे

(B) यशवंत मनोहर

(C) केशव मेश्राम

(D) गंगाधर पानतावणे

45. पुढीलपैकी कोणता काव्यसंग्रह दया पवार यांचा आहे ?

(A) उत्थानगुंफा

(B) विद्रोहाचे पाणी पेटले आहे

(C) कोंडवाडा

(D) नागफणा आणि सूर्य

46. 'पंचवार्तिक' या पहिल्या व्याकरणग्रंथाचा निर्माता कोण ?

(A) भीष्माचार्य

(B) नागदेवाचार्य

(C) कविश्वराचार्य

(D) कृष्णमुनी डिंभ

47. 'पाईकीचे अभंग' कोणी लिहिले ?

(A) संत तुकाराम

(B) कान्होबा

(C) वेणाबाई

(D) जनाबाई

48. भिन्न भिन्न वृत्तांमधील 'ज्ञानेश्वरविजय' आणि 'चिद्‌बोध रामायण' या ग्रंथांची रचना पुढीलपैकी कोणत्या कवीची आहे ?

(A) निरंजनमाधव

(B) अमृतराय

(C) आनंदतनय

(D) कचेश्वर ब्रह्मे

49. शाहीर सगनभाऊ यांचा साथीदार कोण होता ?

(A) रामा सुतार

(B) रामा न्हावी

(C) रामा गोंधळी

(D) रामा कुंभार

50. 'शिवदिग्विजया'चा कर्ता कोण ?

(A) चित्रगुप्त

(B) खंडो बल्लाळ चिटणीस

(C) त्रिंबक सदाशिव पुरंदरे

(D) कृष्णाजी अनंत सभासद

51. 'रविकिरणमंडळा'त केवळ एकच सूर्य होता; तथापि अन्य सर्व कवी केवळ किरणे होती, अशा आशयाच्या विधानातील 'सूर्य' हे संबोधन कोणाला उद्देशून आहे ?

(A) यशवंत

(B) गिरीश

(C) माधव जूलियन

(D) यशवंत

52. कादंबऱ्या व कादंबरीकार यांच्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या पर्यायामधून उचित पर्याय निवडा :

| | |
|---|---|
| (1) झेलझपाट | (5) दुर्गा भागवत |
| (2) हाकुमी | (6) अनिल सहस्रबुद्धे |
| (3) महानदीच्या तीरावर | (7) गोदावरी परुळेकर |
| | (8) सुरेश द्वादशीवार |
| (4) डांगाणी | (9) मधुकर वाकोडे |

**पर्याय :**

(A) (1)–(5), (2)–(6), (3)–(7), (4)–(8)

(B) (1)–(8), (2)–(9), (3)–(7), (4)–(6)

(C) (1)–(8), (2)–(7), (3)–(6), (4)–(5)

(D) (1)–(9), (2)–(8), (3)–(5), (4)–(6)

53. 'आणि बाकीचे सगळे' आणि 'बिनमौजेच्या गोष्टी' हे कथासंग्रह कोणाचे ?

(A) श्याम मनोहर

(B) नरेश

(C) रंगनाथ पठारे

(D) श्री. दा. पानवलकर

54. पुढील नाटकांतील कोणती नाट्यकृती 'ब्लॅक कॉमेडी'च्या प्रकारात गणली जाते ?

(A) शनिवार-रविवार

(B) बेगम बर्वे

(C) महापूर

(D) महानिर्वाण

55. 'निबोणीच्या झाडामागे' हे ललितलेखन कोणाचे ?

(A) मधुकर केचे

(B) श्रीनिवास कुलकर्णी

(C) मंगेश पाडगावकर

(D) विजय तेंडुलकर

56. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द कन्नड भाषेतून मराठी भाषेत आले आहेत ?

(A) भीड, गुंड, भांगार

(B) मुंगी, वारिक, कापडी

(C) अंधार, आरोगण, ओळग

(D) मेहूण, भाऊ, पाऊस

57. सांकल्पनिक अर्थ समान असणारा शब्दांचा गट कोणता ?

(A) डोळा, कान, नाक

(B) डोके, हात, पाय

(C) डोळा, नेत्र, चक्षू

(D) हात, पाय, बाहू

58. वैद्य-गुणे ह्यांच्यातील वादामुळे प्रामुख्याने कोणत्या मुद्द्यांच्या विचारास चालना मिळाली ?

(A) मराठीच्या उत्पत्तीचा काल व कारण

(B) शिलालेखांचे पौर्वापर्य

(C) ताम्रपटांची सत्यासत्यता

(D) शंकराचार्यांचा काळ

59. पुढीलपैकी कोणता विशेष बोलीभाषेचा **नाही** ?

(A) उत्स्फूर्तता व स्वाभाविकता

(B) व्याकरणाची अनुपस्थिती

(C) अनौपचारिक व्यवहारात वापर

(D) मौखिक व्यवहारात प्राधान्य

60. 'ऐ' व 'औ' हे मराठीतील स्वर :

(A) थेट संस्कृतमधून आले आहेत.

(B) जवळच्या स्वरांचा संयोग करण्याच्या प्रवृत्तीतून आले आहेत.

(C) प्राकृतातून आले आहेत.

(D) अपभ्रंशातून आले आहेत.

61. "तत् अदोषौ शब्दार्थौ सगुणौ अनलंकृती पुनः क्वापि॥" ही व्याख्याची व्याख्या कोणी केली आहे ?

(A) जगन्नाथ

(B) विश्वनाथ

(C) मम्मट

(D) वामन

62. काव्याचे 'शिरोभूत' प्रयोजन कोणते मानले गेले आहे ?

(A) आनंद

(B) कीर्ती

(C) प्रचार

(D) धर्म

63. 'गौडी' रीतीत कोणत्या गुणाचे प्राचुर्य असते ?

(A) श्लेष

(B) ओज

(C) प्रसाद

(D) सौकुमार्य

64. 'वीर' रसाचा स्थायीभाव कोणता आहे ?

(A) कांती

(B) रति

(C) जुगुप्सा

(D) ओजस्

65. 'जुगुप्सा' या स्थायीभावापासून कोणत्या रसाची निष्पत्ती होते ?

(A) करूण

(B) बीभत्स

(C) हास्य

(D) अद्‌भुत

66. 'पाया-इमला' सिद्धान्त कोणी मांडला आहे ?

(A) ल्युकाच

(B) कार्ल मार्क्स

(C) मार्क्यूज

(D) सार्त्र

67. 'संस्कारनिष्ठता' हे कोणत्या समीक्षापद्धतीचे वैशिष्ट्य आहे ?

(A) आस्वादक

(B) मार्क्सवादी

(C) रूपवादी

(D) समाजशास्त्रीय

68. 'आहे मनोहर तरी' या आत्मचरित्राची शैलीवैज्ञानिक समीक्षा पुढीलपैकी कोणत्या समिक्षकाने केली आहे ?

(A) द.दि. पुंडे

(B) चंद्रशेखर जहागिरदार

(C) रमेश धोंगडे

(D) रमेश तेंडुलकर

69. 'सामूहिक नेणीव' ही संकल्पना कोणी मांडली आहे ?

(A) एफ्.आर्. लेविस

(B) लाकांन

(C) कार्ल युंग

(D) सिग्मंड फ्राइड

70. जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या पर्यायामधून उचित पर्याय निवडा :

| | |
|---|---|
| (1) कविता आणि प्रतिमा | (5) म.सु. पाटील |
| | (6) सुधीर रसाळ |
| (2) काव्याची भूषणे | (7) वसंत आबाजी डहाके |
| (3) कवितेचा रूपशोध | |
| (4) कवितेविषयी | (8) म.वा. धोंड |
| | (9) गंगाधर पाटील |

**पर्याय :**

(A) (1)–(8), (2)–(6), (3)–(9), (4)–(7)

(B) (1)–(5), (2)–(9), (3)–(6), (4)–(8)

(C) (1)–(6), (2)–(8), (3)–(5), (4)–(7)

(D) (1)–(9), (2)–(6), (3)–(8), (4)–(5)

71. नाटकाला 'अभिनेयार्थ काव्य' असे कोणी म्हटले आहे ?

(A) भामह

(B) दण्डी

(C) उद्‌भट

(D) वामन

72. ॲरिस्टॉटलने साहित्यप्रकारांचे वर्गीकरण करताना पुढीलपैकी कशाला स्थान दिलेले **नाही** ?

(A) विलापिका

(B) लिरिक

(C) उद्देशिका

(D) शोकनाट्य

73. पुढीलपैकी कोणत्या साहित्यप्रकाराचे स्वरूप संमिश्र आहे ?

(A) चरित्र

(B) कादंबरी

(C) नाटक

(D) कथा

74. कलाप्रकार व साहित्यप्रकार यांच्याविषयीचे सिद्धान्त म्हणजे बौद्धिकतावादी घोडचुकीचा सर्वांत मोठा विजय, असे कोणी सांगितले ?

(A) ॲरिस्टॉटल

(B) प्लेटो

(C) काण्ट

(D) क्रोचे

75. 'ट्रॅजिडी इज अ सेन्स ऑफ मॅन्स पार्टिसिपेशन इन प्रोसेस बियाण्ड हिमसेल्फ' ही व्याख्या कोणाची ?

(A) केनेथ ब्रूक

(B) जॉर्ज लुकाक्स

(C) हिलमन

(D) लेस्की एल्बिन

**ROUGH WORK**